जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
जिल्हा परिषद कोल्हापूर
पत्ता - कागलकर हाऊस , पहिला मजला, नागाळा पार्क, जिल्हा परिषद कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक - (०२३१) २६५१०४४
ई मेल आयडी -nbakolhapur@gmail.com

जा.क्र.dwsm/वशि-१६/२०१७ दि.१०/७/२०१७

प्रति,
मुख्याध्यापक,
वि.म./प्राथमिक/माध्यमिक---------------(सर्व)
तालुका-------------(सर्व)

विषय - स्वच्छ भारत मिशन(ग्रामिण) अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी उपक्रम राबविणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये, संपूर्ण कोल्हापूर जिल्हा १००% हागणदारीमुक्त होण्यासाठी विविध उपक्रंम राबविण्यात येत आहेत. या अतर्गत तालुक्यातील सर्व कुटूंबाकडे वैयक्तिक शौचालय असणे व त्याचा वापर करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आलेली आहेत. शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती करणे, नवपिढिस आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करण्याची मानसिकता निर्माण करणे, ती वृध्दींगत करणे आणि तिचे संवर्धन करणे आवश्यक आहे. यासाठी यावर्षीच्या शालेय सत्रापासून पूढीलप्रमाणे उपक्रम राबविण्याचे आहेत.

१. आपल्या शाळेतील शौचालय असलेल्या व नसलेल्या विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय यादी तयार करण्यात यावी. ज्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय सूविधा नाही अशा विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांकडे शौचालय बांधणीसाठी बालहट्ट करणेबाबत सूचित करावे.

२. तसेच शौचालय बांधकामासाठी पालकांना प्रवृत्त करण्यासाठी विद्यार्थ्यांने पालकांना आवाहन करणारे पत्रलेखन उपक्रम आयोजित करण्यात यावा. याअंतर्गत शौचालय नसलेल्या विद्यार्थ्यांच्याकडून त्यांच्या पालकांच्या नावे पत्रलेखन करून घ्यावे. याद्वारे पत्रलेखनाचा उपक्रम व स्वच्छतेविषयी जागृती असे दोन्ही उपक्रम पार पडतील. पत्रलेखनाचा मसूदा सोबत जोडला आहे.

३. ग्रामपंचायत क्षेत्रात स्वच्छतेविषयी जागृती होण्यासाठी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी प्रभात फेरी आयोजित करावी.

४. ज्या कुटुंबाकडे शौचालय नाही अशा कूटूंबाच्या दारात जाऊन ढोल वाजनाचा उपक्रम आयोजित करण्यात यावा.

५. गावातील शौचालय नसलेली कूटूंबाची यादी करून त्या कूटूंबांना शौचालय बांधकामासाठी प्रवृत्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदरची कूटूंबे वाटून द्यावीत. कूटूंब वाटप करीत असताना वरीष्ठ इयत्तेतील विद्यार्थ्यांना वाटप करावे.

६. सदरचे उपक्रम राबवित असताना विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य शिक्षण उपक्रम राबविण्यात यावा. या अंतर्गत स्वच्छतेचे संदेश व त्याचे पालन याची नियमित अंमलबजावणी करण्यात यावी.

वरील प्रमाणे उपक्रम राबवून संपूर्ण जिल्हा१००% हागणदारीमुक्त होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आहेत.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पा.व स्व.)
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

प्रत माहितीस्तव सविनय सादर:- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. कोल्हापूर.
प्रत माहिती व पूढील उचित कार्यवाहीसाठी:- शिक्षणाधिकारी(प्राथमिक/माध्यमिक) जि. प. कोल्हापूर.